# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २३४ /२०२६**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित स्वरुपाच्या कामासाठी घेण्याबाबत सुधारित मार्गदर्शक तत्वे

**अ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेवेतून गट-अ आणि गट-ब संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी :**

१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ रोजी निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णय अकृषी विद्यापीठांना बंधनकारक नाही. मात्र विद्यापीठातील रिक्त पदांची सद्यःस्थिती व प्रशासकीय/शैक्षणिक/वित्तीय कामांचा व्याप विचारात घेता सदर संवर्गातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा विवक्षित कामासाठी करार पध्दतीने घ्यावयाच्या झाल्यास त्याकरिता सेवाशर्ती व मानधन या बाबी निश्चित करण्याकरिता सदर शासन निर्णयाचा आधार घेण्यात येईल.

२) विद्यापीठाकरिता आकृतीबंधानुसार मंजूर असलेल्या गट-अ व गट-ब वर्गामधील दिनांक ३१ मे, २०२६ अखेर एकुण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० टक्के पदे (गट-अ मधील ०९ पदे आणि गट-ब मधील ०९ पदे) भरता येतील.

३) गट-अ व गट-ब मधील विविध पदांवरुन सेवेमधून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पध्दतीने सुरूवातीला जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत सहभागी करुन घेण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी निर्णय घेऊ शकतील. याबाबत सदर शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या निवड प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल.

**(ब) सर्वसाधारण अटी :**

१)

| सेवानिवृत्ती समयीचे पदनाम | नवीन अनुज्ञेय पदनाम | वेतन |
|---|---|---|
| **गट अ मधील पद** | "विशेष कार्य अधिकारी-१"<br>(OSD-1 - Officer on Special Duty -1) | विद्यापीठ आस्थापनेतून गट-अ व गट-ब या संवर्गातील विविध पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची शासनाकडून ज्या अंतिम वेतनास मान्यता मिळालेली आहे तेच वेतन हे सेवानिवृत्तीचे अंतिम वेतन म्हणून ग्राह्य धरण्यात यावे व त्यातून प्रत्यक्ष/मानिव निवृत्तीवेतन वजा करुन येणारी रक्कम प्रतिमाह देय राहील. |
| **गट ब मधील पद** | "विशेष कार्य अधिकारी-२"<br>(OSD-2 - Officer on Special Duty -2) | |

२) उपरोक्त विशेष कार्य अधिकारी (१ व २) हे नियमित पदावर कार्यरत असणा-या विभागप्रमुखांच्या अधिनस्थ कार्यरत राहतील व त्यांना कोणतेही वित्तीय अधिकार असणार नाही.

३) विशेष कार्य अधिकारी (१ व २) या नियुक्तीच्या वेतन निर्धारणासाठी संबंधित सेवकाचे शासनाकडून मिळालेले अंतिम वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे अशा प्रकारे नियुक्ती समयी निर्धारित केलेले वेतन पूर्ण नियुक्ती कालावधीसाठी लागू राहील.

४) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित स्वरुपाच्या कामासाठी घेण्याकरिताची सर्व प्रक्रिया ही माहे डिसेंबर, व माहे जून अखेर राबविण्यात येईल. तसेच याकरिता सेवानिवृत्तीस दोन-तीन महिने अवधी असणाऱ्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांस सदर प्रक्रियेमध्ये अर्ज करण्यास संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

५) संबंधित सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी रुजू होण्यापूर्वी त्याचे शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा रुग्णालय/विद्यापीठातील आरोग्य केंद्र यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन विद्यापीठ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

६) विद्यापीठ सेवेत सेवानिवृत्तीनंतर सहभागी करुन घेतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ कामात कुचराई केल्यास, सेवेत अनियमिता किंवा वेळकाढूपणा केल्याचे आढळल्यास/निदर्शनास आल्यास सेवेतील संबंधित विभागप्रमुखांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या अधिकारानुसार कोणत्याही कारणाविना विद्यापीठ सेवेतून कार्यमुक्त करण्यात येईल. तसेच, सदर अधिकारी सलग १५ दिवस विभागामध्ये गैरहजर राहिल्यास संबंधितांचा कार्यकाल संपुष्टात आणण्यात येईल. याबाबत संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्याने केलेल्या पत्रव्यवहाराची कोणत्याही प्रकारची दखल कार्यालयाकडून घेण्यात येणार नाही.

७) सेवानिवृत्त अधिकारी यांस सहभागी करुन घेतल्यानंतर तो ज्या विभागामधून सेवानिवृत्त झालेला आहे, तो विभाग किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर विभागामध्ये नेमणूक करण्याचे आणि प्रशासकीय सोयीसाठी बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील.

८) सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांना सहभागी करुन घेतल्यानंतर त्यांना फक्त किरकोळ रजा देय राहतील. तसेच सदर संबंधितांस कामकाजाची वेळ ही कार्यालयीन वेळेप्रमाणे राहील. तसेच उपस्थितीची नोंद हजेरीपत्रक व बायोमॅट्रिक प्रणालीव्दारे नोंदविणे बंधनकारक राहील.

९) सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांना सहभागी करुन घेतल्यानंतर त्यांस शासनमान्य पदांवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांस मिळणारे इतर कोणत्याही सोयी-सुविधा, सवलती व आर्थिक लाभ हे देय राहणार नाहीत.

**(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 2585
दिनांक : 11 JUL 2026